# Positive Story of Nagpur Rural Police

**दिनांक ०८/०४/२०२५**

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कन्हान** :—फिर्यादी अतुल चिंतामण मदनकर,वय २९ वर्ष रा. बोरडा ता. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. ४८/२३ कलम ३०७,३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व अरोपी क्र. ०१ नामे अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, रा. बोरडा ता. पारशिवनी यांच्यात घटनेच्या काही महीण्यांपुर्वी गावातील एका कार्यक्रमात भांडण झाले होते, या घटनेचा मनात राग धरून घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा गावात सुरू असलेला कुस्तीची आम दंगल व रेकॉर्डींग डान्स चा कार्यक्रम बघत असतांना स्टेज लगत लोंकाची गर्दी जमलेली असल्याने गावातील काही इसम गर्दीतील लोंकाना बाजुला करीत असतांना आरोपी क्र. ०१ अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, रा. बोरडा ता. पारशिवनी याने फिर्यादीचे गावातील एका इसमास धक्का बुक्की करून थापड मारल्याने फिर्यादीने आरोपीस हटकले असता यातील तिन्ही आरोपी **१)अभिषेक नरेंद्र महल्ले वय २२ वर्ष, २)विकास गुणवंता तिजारे वय २५ वर्ष, ३)आकाश गुणवंता तिजारे वय २७ वर्ष सर्व रा. बरोडा ता. पारशिवनी**यांनी संगणमत करून फिर्यादीस हात बुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. ०३ याने त्याच्याजवळील चाकुने जिवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादिच्या पोटाच्या उजव्या कुशीत दोन घाव मारून फिर्यादीस गंभीर जखमी केले , अश्या फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद होता.

. **सदर प्रकरणाचे तपास सपोनि श्री पराग फुलझले ,पो. स्टे. कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश — ३ श्रीमती एस.पी.पोंक्षे यांनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी**

वरील नमुद आरोपी क्र ३ याला सदर गुन्हयात कलम ३०७ भादंवि मध्ये ०५ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/— रू दंड, दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास आरोपी क्र १ आणि २ यांना कलम ३२३ भादवि मध्ये १,०००/रू दंड,दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती डी.एस. गणगणे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार ईश्वर हुड ब.नं २३५० पो.स्टे. कन्हान यांनी मदत केली आहे.